ग्रं. सं. ठाणे.
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. २७५
सन १९२८

# काव्योपहार

मराठी ग्रंथ संग्रहालय
स. क्रमांक
ठाणे.

REFBK-0003440
REFBK-0003440

किंमत ८ आणे

न. चिं. केळकर.

# काव्योपहार

नरसिंह चिंतामण केळकर

यांच्या

## कांहीं नव्या कविता

संकाव्य नं. ...
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ३४४० 3440
शाखा

सोल एजंट्स:
विश्वनाथ गणेश आणि मंडळी, पुणें.

REFBK-0003440
REFBK-0003440

१९२७

प्रकाशक—काशीनाथ नरसिंह केळकर, बी. ए. ( टिळक. )
५५४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मुद्रक—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# प्रस्तावना

ता. २२ मे रोजीं भरणाऱ्या साहित्यसंमेलनाला उद्देशून साहित्य-भक्तांना कार्यकारी मंडळानें अशी एक विनंति केलेली वाचण्यांत आली कीं, कोणीं कांहीं नवीन कविता केल्या असल्यास त्या संमेलनाकरितां पाठवाव्या. या विनंतीस अनुसरून तीं॰ तात्यासाहेब केळकर यांच्या नवीन कवितांचें हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्याची कल्पना मला सुचली.

यांतील १४ कवितांपैकीं 'सिंहदुर्ग-प्रशस्ति' याखेरीज बाकीच्या सर्व कविता गेल्या वर्ष दीड वर्षांत रचलेल्या आहेत. विशेषतः कविता क्रमांक १ चा पहिला भाग, २ ते ९, आणि १४ या कविता गेल्या डिसेंबरांतील शेवटच्या दोन आठवड्यांत शिरवळ मुक्कामीं रचल्या आहेत. ११ वी कविता ही सन १९१५ सालीं सिंहगडावर लिहिली गेली; पण ती अपुरी असून आजवर तशीच बाजूला पडून राहिली असल्यामुळें तिचाही समावेश येथें केला आहे. ८ वी कविताही म्हटली तर अपुरी असून, ती पुढें केव्हांतरी बरीच वाढविली जाण्याचा संभव आहे.

हें पुस्तक साहित्यसंमेलनास भेट म्हणून प्रसिद्ध केलें असल्यामुळें त्याला 'काव्योपहार' हें नांव दिलें आहे.

पुणें,
ता. २२ मे १९२७.

काशीनाथ नरसिंह केळकर.

# काव्योपहार

## १

## विरहिणीची प्रणयपत्रिका

[ पहिला नमुना ]

### विशिष्टाद्वैत

माथां आदरिले सुदीर्घ चुरिले घेऊनि अंकावरी।
होतां दृष्टिस आड पाय अजि ते मी होतसें घाबरी॥
भासे शून्य मला सदा सदन हें कीं येतसे खावया।
आणीं धीर पदोपदीं मनिं परी तो सर्व जाई लया॥ १

गाई हंबरती उदास बघती मी जात जैं दोहना।
प्रेमानें कुरवाळिलें तरि नये संतोष त्यांच्या मना॥
वाटे लावुनि नेत्र तोहि थकला काडी तृणाची न घे।
खंड्या खिंकाळुनी करी थयथया तोडोनि दावें निघे॥ २

सोन्यानें घर शोधिलें सकळही दारीं उभा राहिला।
रागानें झिडकारिला मधुर जो हातांत खाऊ दिला॥
पोटीं भूक परी उपोषण करी पाटीं निजोनी कण्हे।
येणें होउनि घास घालिति मला जेवीन तेव्हां म्हणे॥ ३

वासाचीं फुललीं फुलें तरतरा फोफावल्या मंजिऱ्या।
आलासे भर चंपकादि तरुनां तैसाच तो मोगऱ्या॥
उद्यानीं शिरतें परंतु कुसुमां ना धैर्य ये तोडण्या।
अर्पू तीं कवणा विचार मनिं हा देई मला डागण्या॥ ४

केले हार परोपरी सुबकशा माळा तशा गुंफिल्या ।
झाल्या व्यर्थ करंडकीं रचुनियां पूजार्थ ज्या ठेविल्या ॥
कीं पुष्पार्थ मला करील न कुणी प्रेमोद्भवा याचना ।
शोभे पूजनकर्मि जी सु-दयिता देवप्रिया आपणां ॥ ५

पोथी वाचुनियां जपासि बसतें ध्यानस्थ मी होउनी ।
बोटें चाळवितें तरी न सरती माळेंतले ते मणी ॥
देवाचें जरि नाम घेइन म्हणे येतें तिथें आपुलें ।
घेतां तें मन लाजवोनि म्हणतें हें काय गे हा खुळे ! ॥ ६

पूजामंचक मोकळा बघुनियां देवगृहाभ्यंतरीं ।
शून्याकारचि तें गमे मजपुढें मूर्ती उभ्या त्या जरी ॥
माझे देव पती न अन्य मज तत्प्रीत्यर्थ पूजार्ह ते ।
प्राणावांचुनि देहमंदिर गमे तैसेंच मातें रितें ॥ ७

घेतां घास मुखीं गळीं न उतरे अर्धाहि पाण्याविणें ।
हातें वाढियलीं न आज तुमच्या पात्रांत कीं भोजनें ॥
खातां आवडता पदार्थ उरतो गोविंद-नामें मला ।
प्रेमोच्छिष्टविभाग ठेवित असां तो आज ना लाभला ॥ ८

शय्येला पद लागतां कर पुढें हो पादसंवाहना ॥
कोणी नाहिं तिथें बघोनि मजला ये दुःखसंवेदना ॥
टेकोनी बसतांचि नेत्र मिटती जाते निशा संभ्रमीं ।
स्वप्नें इष्ट अनिष्ट फार पडुनी अस्वस्थ होतें श्रमी ॥ ९

देई धीर मनासि आजवरि मी आतां प्रयत्न वृथा ।
चोरी काय मला जिवास कथण्या माझ्या जिवाची कथा ॥
संकेतावधि खास सर्व सरली आतां घरीं या गडे ।
द्याना ! दर्शन सत्वरी उचलुनी घेवोनि सोन्या कडे ॥ १०

[ दुसरा नमुना ]

## शुद्धाद्वैत !

रे माझ्या छकुड्या सुवर्णतुकड्या प्रेमी गड्या सौंगड्या।
ये धावोनि असाच ये मजकडे चौखूर टाकी उड्या ॥
लोळें स्वर्गसुखीं जरी निशिदिनीं मी लूट वाटे करी।
थोडेंसें चुकल्यापरीस गमतें कीं तूं न वांटेकरी ॥ १

आधीं आंथरुणावरोनि उठतें आठांनवांच्या पुढें।
सांगे डाक्टर कीं प्रभातहिम तें हो नाजुकां वावडें ॥
पेले मांडुनि बैसतें मग चहापानास मेजावरी।
देतें बैसवुनी समोरच तुझ्या खुर्चीमधें मांजरी ॥ २

जातें पुस्तकसंग्रहालयिं तदा शोधीत कादंबऱ्या।
ज्या लीलाप्रणयप्रकर्ष कथिंती त्या भासताती बऱ्या ॥
वाटे वाण मला तुझीच परि कीं वाचून दावूं कुणा।
माझ्या पाद्तला समीप जरि तूं घ्यायासि ना लोळणा ॥ ३

जातां जात नसे तिपार म्हणुनी मी आडवी होउनी।
पर्यंकीं भर तास दोन पडतें निद्रेसि आलिंगुनी ॥
माशामच्छर वारिता कर तुझा नाहीं म्हणोनी मला।
ये ना झोंप तदा सुदीर्घ सखया मी आठवीतें तुला ॥ ४

होतां ऊन्ह कमी क्लबांत निघतें क्रीडार्थ मी जावया।
माझा ओव्हरकोट बॅट नससी सांगाति तूं घ्यावया।
जोडीदार गडी नवा प्रतिदिनीं साजे तसा शोधितें।
खाके घेउनि तत्करा कशितरी दांपत्य संपादितें ॥ ५

आहे उत्सव शारदीय पडतें रात्रीं कसें चांदणें।
येताती वनभोजना मज नवीं सप्रेम आमंत्रणें ॥
होडींतूनि मला किती फिरविती कासारपृष्ठावरी।
हातीं घेउनि कर्णसूत्र वदनें मी वाजवी बांसरी ॥ ६

सप्ताहामधिं बॉल चार झडले श्रीमंत मित्रांघरीं ।
नाचोनी दमलें अतिश्रमभरें वाटे फुटे मी उरीं ॥
होतें मी तुज आठवीत. परि तूं होसी असोनी वृथा ?।
द्यावा हात परा नरा युवतिनें नाचांत आहे प्रथा ७
होतां उत्तररात्र मी परतुनी खेदें घरीं येतसें ।
अर्धत्यक्त सुखोपभोग म्हणुनी लागे मनाला पिसें ॥
घेवोनि निजतें समीप कुतरा विश्वासु मोत्या गडी ।
होतां खूण चलाख घालित पहा छायेवरी जो उडी ॥ ८

२

# आधुनिक गवळ्याचें गाणें

[ सिमल्यावरील एक दृश्य ]

हिमालयांतिल खडकाळें पाउसकाळीं जळ निथळें
खडकाळें मग शेवाळें शेवाळ्याचें बनें अळें
अळें चिमुकलें वाटोळें भरुनि वाहिलें मेघजळें
मेघजळानें ढेंपाळें ढासळुनी भरलें पाळें
कागशीट कोठुनी गळे बीज रुजे तेंही न कळे
नकळत भूमी भेगाळे भेगेंतुन अंकुर उमळे
अंकुरास लागलीं दळें 'वंशवेल' वाढला बळें
पानांचे उमलले कळे कळे तशीं विकसलीं फुलें
फुला आगळीं इवलिं फळें स्वप्नांतिल संसार फळे
पुन्हा कोसळे वाळिव बळें मातीला मामला मिळे
वाहुनि माती पुन्हा तळें मातीवांचुन सुनें अळें
यदृच्छेनें जीव जुळे यदृच्छेनें जीव गळे

* * *

३

## कुग्राम कीं सुग्राम ?

आनंद जेथ आराम
तें कुग्राम न सुग्राम ॥ध्रु०॥

येथ ना चौघडा वाजे
जात्याची घरघर गर्जे ॥
कासया घड्याळें गजरी
कोंबडा आरवे दारीं ॥
येथ ना फ्लशिंग् संडास
परि एक न भेटे डांस ॥
संग्रहीं न टुथ पावडर
दातवण वनस्पति मधुर ॥
ना ब्रश स्ट्रॉप रेझर
परि गालिं गुलाबी नूर ॥
कोण घे चहाचें पाणी
धारोष्णचि अमृतावाणी ॥
येथें न पाव बिस्कीट
परि शेंगा हुरडा अविट ॥
हव कुणा पिअर्सच् सोप ?
मउ अंगचि आपोआप ॥
येथ ना गुप्त अंघोळ
डुंबण्या जलाशय खोल ॥
ना वाटी ताट रुपेरी
पत्रावळ थोर दुहेरी ॥
पक्वान्नें येथ न घरचीं
परि अन्ना स्वर्गीय रुची ॥
कां करा मसाली भाज्या
प्रत्यहीं मिळति जरि ताज्या ॥

ना विडा त्रयोदश गूणी
मुखशुद्धि फळें तोडोनी ॥
येथें न बिछाना खासा
परि निद्राभंग न सहसा ॥
खेळ ना क्रिकेट् टेनीस
मोकळी हवा सहलीस ॥
येथ ना क्लबाची मौज
परि वेळ जातसे सहज ॥
ना वीणा पेटी येथें
पक्ष्यांचीं मंजुळ गीतें ॥
वाचण्या न दैनिक वृत्त
अंतर्मुख राही चित्त ॥
येथ ना तार ना पोष्ट
मन सांगे निज गुजगोष्ट ॥
हावि कशास बिजली बत्ती ?
जरि कार्या पुरते पणती ॥
येथं ना घड्याळी कांटा
वेळ जाइ बारा वाटा ॥
बाजारपेठ ना येथें
देवघेव कोणि न करिते
येइ ना चेकबुक हाता
परि पैसा खर्चापुरता ॥
येथ ना सार्वजनचर्चा
परि आत्मस्फूर्तिची अर्चा ॥

* * *

४

# दिव्य मोटार

[ एक रूपक ]

कुणबाऊ लावणीच्या चालीवर

मोटार चालि कुणिकड  बाच्या बाला सुट्ल न कोड ॥ ध्रु०॥
चौयुगाचिं क्येलीं चाक  त्यात पाल्डी खालवर भोक
वरसांचि घुसवली नाक  तिन काळाच जोडल दांडक ॥ १
मोटार खडी अंतराळीं  टप चढविला आभाळी
मखमाल मढवली निळी  कडकडन फीत काजळी ॥ २
नक्षित्र दिव ठायठाई  जणु इज्राचि क्येलि रोषनाई
काळुखाला थारा न्हाई  पाताळिं पळुन त्यो जाई ॥ ३
चांदसूर्य आगिच गोळ  दो बाजु दोन लटकावल
दिपवती जगाच डोळ  'फ्रंट लाइट' मुलखा आगळ ॥ ४
पासिंजर दाटुन बसती  त्येचि कुणी करावी गिणती
समद्यांच्या तिकिट हातीं  दिलि जल्माचिं मांडुन खातीं ॥ ५
सामानहि भरलं भारी  ट्रंक डब उंच डोंगरी
फळाफुलांच्या करंड्या वरी  साता समिंद्राच्या घागरी ॥ ६
यंत्रांत शिलगली आग  कोण पेटवि त्येचा न थांग
हज्जार कोस आगमाग  पसरली अक्षि धगधग ॥ ७
मोटार हकाया बसला  गडि कधीं कुणा ना दिसला
त्येचा चेरा दरेस कसला  होरणार समदा फसला ॥ ८
लइ हुशार ह्यो ड्रायव्हर  एक हातच चाकावर
दुसऱ्यान करी कारभार  डोळा ठेवी समद्यावर ॥ ९

---

ऱ्हस्वदीर्घांचा विधिनिषेध नाहीं.

बिन हात लावता जरा   चाक फिरत्याती गरगरा
उलटसुलट घेत्याती फेरा   न्हाइ खिनाचा त्येना थारा ॥ १०
मोटार चालली तडक   जाइ तकड सडकच सडक
हवि तशी मऊ अन् कडक   जणु संगमरवरी खडक ॥ ११
बाजू ना उजवी डावी   तिला धरायला होवावी
मग खुणचा हात कोण दावी   मन मानल तकड न्यावी ॥ १२
भरधाव चाल मोटार   शेंडनक्षित्राचा धूर
माग पसर कोसकोसभर   वाजत शिंग ओंकार ॥ १३
बिन सांध्याचि ही मोटार   उतराया चढाया न दार
गाडीच बनवलं घर   जलमाचि त्यात येरझार ॥ १४
एकला गडी ड्रायव्हर   त्येला लाग ना कुणी क्लीनर
न्हाइ पलडी काधिं अजवर   करण्याला इक्ति रीपेर ॥ १५
भांडवल बी त्येच्या घरच   मोजिना कुणाला कच्च
सार हिशेब हातोहातच   मग कुणा इचारी कस्‌च ॥ १६
बिन ब्रेक अशी मोटार   बिन 'लेसन' बी ड्रायव्हर
आक्षि अखंड चाले दूर   न्हाइ कधीं जणूं संपणार ॥ १७
ह्ये मोटारीच नांव   हव तस कुणी ठयेवाव
ग्यान इश्व म्हणत्याती   इचिभन शबुद बि न येती ॥ १८

═══ ५ ═══

# मी कवि आहें समजलां !

मी कवी जगाचा राजा मजपुढें न तुमच्या गमजा ॥ ध्रु०॥
गाऊनी मम स्तुतिगीतें करभार आपुल्या हातें
अर्पुनी राजभक्तीतें दाविणें तुम्हा नच सुटतें
चाल—जरि मनीं प्रेम नच भरलें गीतांत काव्य न स्फुरलें
मी देइन माफि तुम्हाला परि हक्क न सोडिन अपुला ॥मी॥ १

कविचा हा वंश अनादी अंत तेवि होई न कधीं
आमुचें राज्य हें सगळें कपि महाशयें स्थापियलें
चाल—जो अमुचा पूर्वज मान्य त्यासम तो इतर न अन्य
तत्पुण्यें अजवर आम्ही वैभवा भोगितों कांहीं ॥ मी ॥ २

चौहातीं धरुनी वृक्षा वांकुल्या दावितां पक्षां
चावितां मुखानें पाला वर्णोद्गम सहजाचि झाला
चाल—तेंच होय आदिम काव्य रसपूर्ण उदारहि भव्य
कवि आम्हि तदंशाचि गातों जन त्याचें कौतुक करितो ॥मी॥ ३

विषयांना तोटा नाहीं शब्दांचें बंधन कांहीं
लेखनी स्पर्शितां दुरुन नवरसीं जातसे भरुन
चाल—धावते अलंकृति मागें औचित्य पाठिशीं लागे
मग व्याकरणाचे पाश पावतात सहजाचि नाश ॥मी॥ ४

हातांत शस्त्र जणुं नाचे तोडितों पाय वर्णांचे
कापितों कान मात्रांचे छेदितों हात कान्यांचे
चाल—संपूर्ण शब्द जरि खातों लोप हा काव्यगुण ठरतो
माजवितां अडगळ त्यांची स्तुति भाषासंपत्तीची ! ॥मी॥ ५

शब्दांत अम्हाला नाहीं मृदु कठिण भेद हा कांहीं
मानुं ना देशिपरदेशी समतेनें वागुं प्रजेशीं

चाल—बनवितों समास मजेचे　शत्रुमित्र भेद न बोचे
असवर्ण लावुं जरि लग्न　शब्दजाति करि ना विघ्न ॥मी॥　६

अभ्यासिं जन्म वेंचोनी　योजुनी तर्क अनुमानीं
शास्त्रज्ञ बनवि सिद्धान्त　तरि होत न कधिं निभ्रांत
चाल—परि परामर्श सत्याचा　जणु चाकर कविच्या घरचा
पायाळ काढितो पाणी　सत्य तेंवि कविच्या वदनीं ॥मी॥　७

जें देखे न कधींहि रवी　तळहातीं मिरवील कवी
सर्वज्ञ अशा ईशाचा　शिक्काच कवीची वाचा
चाल—ज्ञानदीपिं काजळ धरलें　तें सगळें शाईंत विरलें
लेखनी जगावरि वितरी　सत्य-तत्त्व पर्जन्य-सरी ॥मी॥　८

सौवर्णिक खणुनी खाणी　टांकसाळि पाडुनि नाणीं
देताति सुवर्णा चलना　परि व्यर्थ श्रम तो त्यांना
चाल—कवि आम्हि चिपा सोन्याच्या　बनवितों योजुनी वाचा
व्यवहार भागवूं नाना　शृंगार पुरवुं ललनांना ॥मी॥　९

काढिताति अनगड रत्नें　मूर्ख लोक बहुत प्रयत्नें
खोदुनी मृत्तिका वाळू　शेषाची फोडुनि टाळू
चाल—परि हिरे रंगि बेरंगी　चिकटले कवीच्या अंगीं
मारुनी फुंक गारोडी　काव्यानें कविही काढी ॥ मी ॥　१०

यमक हीच कविची किमया　ऐंद्रजाल किंवा माया
अक्षरासि अक्षर जुळलें　कविसृष्टिकर्म तरि फळलें
चाल—ईश्वरी शिल्परचनेंत　एकासि न दुसरें जुळत
तद्गुरुनें विद्या न दिली　जी कविच्या अंगीं मुरली ॥मी॥　११

यमकाच्या पायावरती　केवढ्या इमारति उठती
तीच वीट तोच चुनाही　कविसंग्रहिं दुसरें नाहीं
चाल—तोच रंग तीच सफेती　यमकीं गुण सर्वहि येती
त्रिगुणाविण ईश्वर अडला　द्व्यक्षरी कवि यश चढला ॥मी॥　१२

गुंजारव करुनी भ्रमर  रंजवील तव मन फार
परि त्याच्या गुजगोष्टींना  दुरुनि डुलविशी तूं माना
पतंग दावी बहुरंगी  झगा घातला नव अंगीं
त्याजकडे डोळे भरुनी  बघतां तूं तो धन्य मनीं
पक्षी बसुनी शेजारी  गाति गाणिं तुज परोपरी  ६

दिनभर जीवन-अमृतातें  भरविल रविं तुज निज हातें
रात्र घालि तुज पांघरुण  काजळि शालूचें छान
रातकिडा गाउनि गाणीं  रमवुनि निद्रा तुज आणी
चांद चांदण्या हे दीप  तेवति घेतां तूं झोंप
दहिंवर पाजी तुज पाणी  धाराधर तुजला न्हाणी  ७

तुज लागे न अलंकार  स्वयें रूप सुंदर फार
तुझ्या सुगंधित निश्वासें  वनगृह दरवळतें वासें
सौख्यानंदें तव जाती  षड्ऋतुमाजी दिनराती  ८

तुज खुडितांचि लता-माता  खचित करिल ती आक्रांता
ढाळिल रस आसवबिंदू  आटवील करुणासिंधू
जन्मलीस तरि तव तीचा  देह अखंड असे साचा
नाहिं तोडिली तव नाळ  गेला इतुका जरि काळ
ती प्राशि मुळांतुनी जला  तेंच पोंचतें थेट तुला
सत् चित् आनंदहि तीनी  एकचि तुमचीं कणोकणीं  ९

तोडियलें मीं जरि तुजला  द्विवधाचें पातक मजला
विरह न केवळ तो तिजला  प्राणाघातचि जणुं झाला
ईशाघरचे तुम्हि प्राणी  आहे मीहि तसा कोणी
तुला तोडुनी कां होऊं  अपराधी मी तव भाऊ
भावंडें एका घरचीं  अशीच देवहि सृष्टि रची  १०

संकलन ८४०

# फुलराणीला ओवाळणी

भिऊं नको पाहुनी मला   मी तोडिन न तुला फुला ॥ ध्रु०॥
येतां जवळी कांपु लागसी   अधिक्षेप ऐसा कां करिसी ?
परि तुज लावि न मी बोल   दूषित मनुजाचें शील
कुसुमसेवनीं एकच रीति   तुंवा तयाची अनुभविली ती
उच्छेदाविण त्या कांहीं   सौख्य भोगिलेसें नाहीं   १

तीक्ष्ण नखाची तलवार   चालवुनी तुज करि वार
कंठनाळ नाजुक चिरला   वाटे त्या विक्रम केला
वास घेइ डोलवि माना   कोण राक्षसी रसिकपणा !
परि मूर्खा त्या हें न कळे   हिंस्रपशूंचे हे चाळे
प्रेता हुंगी वृक रानीं   तैशि तयाची ही करणी   २

हातीं धरुनी मग दुरुनी   न्याहाळुनि पाहे नयनीं
वर्णन तव सौंदर्याचें   करुनि करुनि आळवि वाचे
अर्पण करुनी दयितेला   धन्य मानितो अपणाला
वाटे त्या तव जन्माचें   सार्थकही केलें साचें   ३

यज्ञपुरोहित पशु वधितो   म्हणतो 'स्वर्गा पाठवितो'
वधकर्मातें उपकार   मानी नर, तो नर न खर
मानभावि ऐसा नाहीं   भिऊं नको गे मज तूंही   ४

राहें सुखें लतिका बाले   दुरुनिच पाहुनि मन धालें
निज मातेच्या मृदु अंकीं   लोळ सुखाच्या पर्यंकीं
कोमल शाखांचे दोले   करुनी त्यावरि घे झोले
चंचळ वारा खेळगडी   घाल त्यासवें तूं फुगडी
मधमाशी सखि घरिं आली   देइ तिला मध भातुकली   ५

एकच देठ निसर्गाचा   आधारवि तुज मज साचा
एक लतेचें तूं फूल   दुज्या लतेचें मी मूल
खेळुं रमूं दोघे मिळुनी   हातीं हातहि घालोनी
ईशाघरिल हवापाणी   नांदूं आनंदें पिउनी
तुज माझा आधार जसा   तुझा वासही मज तैसा   ११

कीटक तुज पीडा देती   निवारीन मी त्यां हातीं
आनंदवुनी मम नयना   फेडिसि तूं अपुल्याहि ऋणा
श्री देशी उद्यानाला   काय दवडुनी लाभ मला
तोडुनि तुज हातीं धरिलें   लोकां दावुनि मिरवियलें
अहंकृतीचा खेळच तो !   उभयांना घातुक होतो   १२

स्पर्शी उष्ण या मम हातीं   कोमेजवि तव मुखकांती
म्लान पाकळ्या होउनिया   गंध श्री जाइल वाया
हानि निसर्गाची करुनी   होइन पापाचाचि धनी
सत्तेचें वेड न मजला   बंधि न घालिन मी तुजला   १३

लतेवरी तूं डौलानें   डोल सदा आनंदानें
दर्शन तव मम जीवाला   सौख्याचा ठेवा गमला
समीपतेचा मोक्ष पुरे   सायुज्यीं रसिकता नुरे
नको धरूं तूं भीति मनीं   गंध तुझा सेविन दुरुनी   १४

७

## दोन जुळीं भावंडें

### [ सुख व दुःख ]

कूट घालितों तुम्हांलागुनि। पाहूं सोडवितो का कोणी ॥ ध्रु०॥
संसाराच्या दीर्घ अंगणीं। कुणि भांवडें खेळति दोनी
करिती इतरांचि न तीं पर्वा। परि कौतुकदर्शन तें सर्वा
कधीं कुठें जन्मलीं न जाणे। अंगीं चार युगांचें लेणें
दिसे न पडलें त्या कांहिं उणें। मानिती न कोणाचें भेणें
त्यांची भाषा न कळे कवणा। जरी पुसावें जाउनि त्यांना
भांवडें हीं आवळिजावळि। बिलगुनि राहति जवळीं जवळीं
एका देठावरि दोन फुलें। तशीं दिसति हीं अतर्क्य बाळें
शामशबल तनु मोहक आनन। शुभ्र तीक्ष्ण परि त्यांचे रदन
नयन नासिका रेखिव कांतिव। शरीर टचटचलेलें ओंतिव
अवयव गोंडस दोघांचे सम। पाहुनि होतो मानसिं विभ्रम
तो हा कीं हा तोहि असावा। भेद न कांहीं भावांभावां

[ २ ]

परोपरीचे खेळ खेळती। परी तयांची नुमजे रीती
प्रारंभ कुठें कुठें अंत वा। कसा कुणाचा जय जाणावा
साध्य कोणतें साधन तेंही। सूक्ष्म पाहतां उकलत नाहीं
मल्लांपरि दोघेंहि झगडती। अंतर्यामिं दिसे परि प्रीती
स्पर्धा करि ना प्रेमा बाधा। प्रेम आणिना युद्धा वांधा ॥
जयापजय जणुं वांटुन घेती। धर्मयुद्धरीती आचरती ॥
एक दुज्याला ठोसा मारी। परि पडल्या सांवरूनहि धरी ॥

[stamp]

[ ३ ]

शेळ्यांचीं कोंकरें कोवळीं। ढुश्शा मारुनि पडतात गळीं ॥
उगिच ओढिती धरुनी कानां। टक्कर देउनि चाविति माना ॥
एक दुज्या हुलकावणि दावी। वळेंच आपण तीही खावी ॥
पळों ऐसें दुसऱ्या दावुनि। उलट दाविते गुरकावोनी ॥
शरद् ऋतूमधिं निर्मळ गगनीं। सहजासहजीं एखादे दिनिं ॥
शबलवर्ण मेघांचे बाळ। वारा कानिं भरोनी चंचळ ॥
सूर्यापुढुनी धांवुं लागती। आढपाढिचा खेळ खेळती ॥
भूमीवरि मग त्यांच्यायोगें। धांवे उन्ह सावलिच्या मागें
सावलि जाइ उन्हासि धराया। खेळ रंगतो गोड पहाया ॥
संसारांगणिं हेही भाऊ। पाठी शिवण्या लागति जाऊं ॥

[ ४ ]

सांगा आतां हीं कोण मुलें। खरेंच आम्हां नाहिं उमगलें ॥
ओळखतां का तुम्ही तयांना। आम्हांला मग कां सांगा ना ? ॥
काय खुळे तुम्हि, नित्यपरिचितां-। भुलुनी ऐसे कसे विसरतां ॥
एक दुःख दुसरें तें सौख्य। खचित तुम्हां हें परिचित-आख्य ॥
खरेंच कीं हो वेडे बनलों। व्यर्थ बुचकळ्यामध्यें पडलों ॥
प्रहर आठ बाराही मास। निकटचि घडतो ज्यांचा वास ॥
सुखदुःखातें कोण न जाणे। केवळ फसलों काव्यवर्णनें ॥
सोपें अवघड करुनि सांगतां। काय कुशलता तुमच्या हाता ॥
तुम्हीच परिचित दिसतां थोडे। भावंडें जुळिं अम्हां न कोडें ॥
तुम्हीं पाहिलीं संसारांगणिं। आम्हां भेटति अंतःसदनीं ॥
आम्हीही तत्कौतुक करितों। स्वयें तयांचे गुण अनुभवितों॥
आम्हिच का सगळें जग तैसें। भावंडांशीं परिचित खासें ॥
कीं सुखदुःखाच्या रांध्याचें। जीवित बनलें सर्व तयाचें ॥

[ ५ ]

निपुत्रिक स्त्री खिन्न मानसीं। गर्भिणि होतां गर्व तियेसी॥
परि डोहाळे पीडा देती। जीव नकोसा तिजला करिती॥
प्रसूतिकालीं सर्व हर्षती। पहिलटकरिण म्हणुनि मनिं भीती॥
अडली बाळंतीण तियेला। शस्त्रयोग आवश्यचि झाला॥
मूल कापिलें म्हणुनी दुःख। माता सुटली जिवें हेंच सुख॥
दुसरे वेळीं सुखप्रसूती। नामकरण थाटानें करिती॥
परि तेराव्या दिवशीं रोग। तान्ह्याला पाहवे न भोग॥
ज्या हातें पाळणा बांधिला। तयेंच पुरण्या खड्डा खणिला॥

[ ६ ]

तिसरे वेळीं कन्या झाली। पुत्र न म्हणुनी मनें रंजली॥
चवथा तो मग पुत्र जहाला। परि दुर्दैवें अंध जन्मला॥
अपत्य होतां पंचम वेळीं। पुत्रकन्यका जाहलीं जुळीं॥
कन्या उपवर होतां चिंता। झोंप न येई सहजचि ताता॥
लग्नसोहळा थोर मांडिला। परि कर्जाचा बोजा जडला॥
पडतां टाळी धन्य वाटलें। कन्यादानीं अश्रु लोटले॥
विवाह झाला म्हणुनी सौख्य। परगृहिं जाते म्हणुनी दुःख॥

[ ७ ]

पुत्र म्हणावा आनंद जरी। त्यांतचि मिसळति चिंतालहरी॥
वंश-उजळणी करिल तरि बरें। न तरि निपुत्रिकताचि सुख खरें॥
द्रव्यलाभ हो आनंदाचा। रक्षणयोग विषय चिंतेचा॥
कीर्ति वैभव सौख्य मानिती। केली कष्टांची कुणि गणती॥

[ ८ ]

देशभक्त कारागृहीं सुखी। तत्सुतकांता मरतात भुकीं॥
वीर पडुनि रणिं स्वर्ग जिंकिती। विधवा पदरीं वदन दडविती
उज्ज्वल मुगुट शिरीं धरि नृपती। राज्य हांकण्यां कष्ट ते किती
छत्र शिरींचें ऊन्ह निवारी। दांडा धरिता ठरे बिगारी

पडदा राखी स्त्रीमर्यादा। एकांताची तिलाच बाधा ॥
तीव्रज्वरें कधि देहीं भरला। रक्तदोष सर्वहि ओसरला ॥
शल्य उपटितां तिडिक मस्तकीं। निघतां तेंच किती होत सुखी ॥
सोडतींतला पैसा दिसला। हर्षवायुनें प्राणाचि गेला ॥

[ ९ ]

हसूं लोटलें फार विनोदें। पोटीं गोळा उठुनि दुःख दे ॥
रम्य गुलाबपुलांना खुडतां। व्रण कंटक तरि करितो हाता ॥
शिकार करुनी ऐट मिरविता। मुठींत प्राणा देउनि फिरतां ॥
पक्वान्नावरि ताव मारिला। अपचनदोषें रोग जडविला ॥
मासा रुचकर म्हणुनि भक्षिला। तीक्ष्ण अस्थिनें गळा चिरियला ॥
कला चालवुनि वस्तु निर्मिली। अर्धें जग करि तिची टवाळी ॥

[ १० ]

सुखदुःखाची अशी सांखळी। तोडितां न ये कुणी किति बळी ॥
सुखदुःखाची सूक्ष्म तागडी। कणभारानें बिघडते घडी ॥
सुखदुःखाचा ताणा बाणा। मिळुनि वस्त्र हें ध्यानीं आणा ॥

८

## वरुणकन्यका

शिरीं पौर्णिमायुक्त चंद्रमा इच्छा हो जलसंचारीं
हातीं घेउनि एकेक वल्हें नौका लोटिलि कासारीं
शांत जळामधिं नाव चालली जशी गालिच्यावर राणी
राजभक्तिनें दुभंग होउनि वाट देतसे तिज पाणी
दूर चाललों तीर सोडुनी पाण्याविण कांहीं न दिसे
प्रचंड कढईमधिं यक्षानें रुपें वितळलें जणुं भासे
गोल किनारा वृक्षलतावृत चौकट जैशी चित्राला
दोनच डोळे एकच दृष्टी याचा खेद मला झाला

[ २ ]

चौ बाजूला नाव फिरवुनी शोभेचा आनंद जरी
यथेष्ट घेई तरी वाटलें शंभर डोळे कां न शिरीं
निसर्गशोभेमध्यें समरस होउनि गेलों आनंदें
एकांतीं सुख परिमित म्हणुनी सहचारेच्छा मनिं नांदे
रात्रिचर पक्ष्याविण दूरहि शब्द करि न कोणी प्राणी
मासे चंचळ येरझरति परि देवें दिधलि न त्यां वाणी
कमळांच्या जाळ्यांतुनि फिरलों कळ्या तोडिल्या सुंदरशा
पानें खुडुनी करंड केला आंत बसविल्या त्या खाशा
अर्पुं कुणा उपहार वन्य हा मी न तयांचा अधिकारी
सत्पात्र न दाना लाभे तरि धनिक मानसीं खेद करी

[ ३ ]

वल्हीं आडवीं नौकेमध्यें ठेविलिं विश्रांती द्याया
छातीवरती हात ठेविले विश्रांतीसुख मज घ्याया
शुभ्र चंद्रिका-दीप्त उदक तें पाहुनि झाला उल्हास
परि स्पर्शसुख सेवायाची उद्भवली मग मनिं आस

 

बसल्या बसल्या हळुच सोडिले नौकाकांठावरि पाय
भक्ष्य म्हणोनी येउनि मासा चाटुनि पळुनी हळु जाय

[ ४ ]

इतुक्यामध्यें मउ हस्तांचा स्पर्श तयां कोणीं केला
तयें विजेचा नाजुक धक्का आरपारि अंगीं गेला
संकट वाटुनि दचकुनि गेलों पाय काढुं लागे वरती
परी कुणीं ते दडपुनि धरिले पाण्यामधुनी नच निघती
मनीं म्हणालों मगर होइ हा तरि कांटे कांहिं न रुतले
महामत्स्य जरि होइ तरि तया पद धरण्या साधन कुठलें
पाय ओढितां जाउं लागला तोल शरीराचा खालीं
ओढणार ती आकृति मजला मनुजवचें बोलति झाली

[ ५ ]

भिऊं नको हे रम्य मानवा अपाय करि ना मी तुजला
हौशी तूं रमवाया आलें भूमीसम या मानि जला
बोलुनि ऐसें दूर ढाकली अर्धदेह सलिलांमधुनी—
काढुनि मग ती उभी राहिली नौका एक्या करिं धरुनी
मनुज स्त्रीदेह आकृतीनें, वरि कांति न परि मनुजाची
वाणी आश्वासनपर झाली तरि शंका अंतरिं जाची
पाण्याखालीं देह झांकला उदकप्रांतीं उभी कळी
कमळजाति ही दिव्य कोणती चिंतुं लागलों ते वेळीं

[ ६ ]

धैर्य धरोनी बोलुं लागलों मनुजवाणि तूं खरि वदसी
परी देवता गंधर्वस्त्री किंवा यक्षिण तूं असती
बोले ती स्मित करुनि लाभ तुज काय लावुनी मम थांग?
कमळकळया तोडण्या अनुमती कोणिं दिली तुज तें सांग
अपराधाची क्षमा करिन तुज जरि अर्पण करिसी मजला
अर्पण कोणा करुं ही चिंता क्षणपूर्वींच पडली तुजला
परि न घेइ मी येथ उभ्यानें तुझ्या हातुनी उपहार
वरुणलोकिं चल जाउं मिळोनी बसुनि तेथ गुंफूं हार

९

## निंदकाला परत भेट

[ गजल ]

जगा निंदावया चाले अहर्निश जीभली तुमची
उडवि ती आगिचा भडका लवंगी तिखट जणु मिरची १

तुम्हां दोषाविना दुसरें दिसेना कांहिंही चांग
जणों प्रभु विश्व रचितांना पुरेशी प्यायला भांग २

स्वताच्या काळिजीं काळें विदोषी रक्त जें भरलें
तयें नेत्रांतुनी तुमच्या जगाचें तोंड सारविलें ३

तुम्ही विद्वेषबुद्धीचा प्रभावी अग्नि पेटविला
तयें जगतांतल्या साऱ्या गुणांचा सिंधु आटविला ४

करी शुभ्रासि काळेरें ऋजू तें वक्र ही किमया
कुठें गेलां शिकायाला कुविद्या थोर मोहमया ५

सुधामय चंद्रबिंबाचे तुम्हांला डाग ते दिसती
पवित्रीं पात्रिं गंगेच्या तुम्हाला आढळे रेती ६

डुले जरि रसिक आनंदें प्रभातीं कोकिळा गातां
गळा काळा तिचा कांहो असा हा दोष दाखवितां ७

प्रकाशा सर्व विसरोनी दिव्याची काजळिच बघवे
तमाचा शत्रु रवि म्हणतां तरी कां रात्रिचा नुगवे ८

धराधर थोर मेघांना निमंत्रुनि करविती वृष्टी
तयांचें अंग रुडकाळें म्हणोनी होतसां कष्टी ९

नद्यांचे पूर वाहोनी समृद्धी प्राणिमात्रांना
चिखल तो लागतो पायां म्हणोनी त्यांसि अवमानां १०

कमळिं जन्मे महालक्ष्मी वहाती पुष्प देवाला
सुगंधा वाण त्या म्हणुनी म्हणां त्या रानटी पाला ११

पितामह जेधवा बसला विधाया विश्वरचनेला
तयें पाचारिलें नाहीं तुम्हाला राग तो आला १२

जरी कां लाभलां असतां प्रसंगीं सूचना द्याया
तुम्हासम त्यास सन्मंत्री चुकाही तो न करता या १३

अनादरि आद्य कुंभार म्हणोनी जाहलां क्रुद्ध
परी घटकर्मिं असला तो खरा खर 'अन्यथासिद्ध' १४

चुकोनी अंश तेजाचा मिळाला काजव्यापुच्छीं
प्रकाशाया जगा साऱ्या तयानें मूर्ख तो इच्छी १५

जसा कण रेडियमचा तो अनंत-स्फुरण-गुणशाली
सहस्रां अन्न पुरवाया जशी पांचाळिची स्थाली १६

तसें वाटे तुम्हां अपुलें अगाध ज्ञान कणमात्र
म्हणोनी दोष काढाया जगाचे मानितां पात्र १७

* * *

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क. 3840

१०

## स्त्री-विषयक सुभाषित–गुच्छ

स्त्रीच्या देहीं त्रिवेणिसंगम सरिता तीन करीती
मुखीं सरस्वति नेत्रीं गंगायमुना नित्य वहाती ॥
शिरिं गंगावनिं चंद्रसूर्य हे वसती करिती नित्य
स्त्रीतें म्हणती संसारांतिल तीर्थ पवित्रहि सत्य ॥
तत्त्वज्ञाना शिकवी स्त्री मज स्याद्वादचि करि सिद्ध
तिला कटि स्यात् न स्याद्वा कविवर्णन हेंहि प्रसिद्ध ॥
स्त्री शिकवी मज वेदांतातें घेउनि मायारूप
अद्वैतांतुनि द्वैत भासवी परोपरीनें खूप ॥
जायापति हा द्वंद्व समासाचि म्हणुनी भांडे मजसी
व्याकरणाविण मजसि तंडण्या अन्य न कारण तिजसी ॥
वामांगावरि स्वत्व तियेचें म्हणुनि अपर्णा पतिला
दर्पणिं पाहुं न देत नटेशा ऐसें वाटे मजला ॥
मर्यादारक्षण हा स्त्रीचा गुण म्हणताती कोणी
प्रेमा मर्यादा नं ठेवणें हांचि गुणंहि मी मानीं ॥
अर्थालंकारप्रिय ललना शब्दालंकृत कविता
त्याज्य उभय मज समान वाटति तुलना त्यांची करितां ॥
वृत्तदर्पणीं प्रेम बसविती स्त्रीवृत्ताचीं नांवें
गणमैत्री जरि कठिण जोडण्या यत्न करित मीं भावें ॥
गंगा ओती प्रेमोदक जरि सगळें शंकर देहीं
तज्जिव्हेचा दाह शमविण्या धरीं चंद्र शिरिं तोही ॥
अर्धांगें अर्पण करि पतिला देतहि पंचप्राण
परि अर्धी न दे दृष्टी संन्मुख सती अशी ती कृपण ॥
शृंगारुनि बसलि दूर दयिता वीणा घेउनि गाया
सत्वर मत्सर अग्नि भडकवी कर्पूरासम काया ॥

म्हणे तिला तो निर्धन म्हणुनी अव्हेर माझा करिसी
भिक्षापात्र प्रसिद्ध पोकळ तुंबा अंकीं धरिसी ॥
चंचल माझें प्रेम म्हणोनी राग मजवरी धरिसी
शतविध पावे स्फुरण निमेषीं तार करीं आदरिसी ॥
गजरा पुष्पांचा प्रिय तुजला प्रहरमात्रें जो सुकला
अष्टौप्रहर स्थिर प्रेम मम दूर लोटिसी मजला ॥
कठोर मी बोललों शब्द जरि दिवसांतुनि एखादा
केशाकर्षककंकताहुनी अधिक तयाचि न बाधा ॥
अर्धोदयपर्व आदरी जन, हीन पूर्ण त्यापरिसि
दयितामुख पूर्णचंद्रबिंबाहुनी कटाक्षात्रि सरस ॥
सुशिक्षित स्त्री वरिली कीं ती अधिक दक्ष गृहकर्मीं
तरि अमुच्या जोड्याहुनि रक्षी जोडा आपुला चर्मीं ॥
स्वर्गामधले देव विलासी खचितचि मनुजाहून
गगनांगणिं हो रात्रिं तयांच्या उभी कलावंतीण ॥
उत्तरध्रुव गृहिं अष्टदिशां ती उषा नाचते खाशी
सूर्य भोगितो एक वत्सरीं सगळ्या बारा राशी ॥
प्रेमाचा पति लाभल्याविना पतिप्रेम पत्नीला
कोण शिकवि? गुरुमुखावांचुनी विद्या नच कोणाला ॥
संसारसुखद्वार उभें तें प्रेम-बिजागिरिवरती
स्नेहलेपनें मृदु न केलि तरि करकर करिल सदा ती ॥
रमा म्हणती अंध बधिर परि ही न तयाची निंदा
दिसति न ऐकूं येति सतीला पतिचे दुर्गूण कदा ॥
गृहिं असे तें अमर म्हणोनी म्हणती स्वर्ग गृहाला
गृहिणी स्त्री परि पंच महाभूतांचा संचय गमला ॥
स्पर्श लागतां हाता नाजुक पृथ्वीगुण ती वाटे
आपतत्त्व तें गालावरच्या अश्रुद्वारें प्रगटे ॥
नेत्रामधली चमक पाहतां तेजहि दिसतें स्पष्ट
वायु संचरे सोडी सुसकारे जें होउनि रुष्ट ॥

आकाशासम शून्य वदन ती होई विरहीं रुतुन
श्री भौतिक ही स्त्रीची रुचते अधिक स्वर्गाहून ॥
स्त्री धिक्कारी छत्रपतीला प्रेम न जरि त्यावरती
'छत्रपति'हि ना खिशांत ऐसा दरिद्रि दयिता वरिती ॥
प्रेमोष्मा जरि अंतःकरणीं विपद्धिमा तो वारी
शालजोडि गोधडी उभय सम मानी ती संसारीं ॥
प्रेम रंगवी संसारपटीं सुंदर छायाचित्र
वन्य स्त्री होतसे चितारिण दिसतें जरी विचित्र ॥
चित्रकार करि रंग विविध परि त्यांत न कांहिं तजेला
प्रेमी स्त्रीच्या अधरोद्गारें पतिवदनीं जो आला ॥
कातर खचितचि विनयशील ललना पति सन्मुख असत
पतिलाभा उल्लंघी पर्वत तरते सिंधूसरिता ॥
प्रेम अंध नच मज तिसरा जणुं शंकर नेत्रचि वाटे
मदनदहन विक्रम तो केवळ प्रेमें त्रिभुवन पेटे ॥
विरहव्यथिता पखालभर जरि औषधरस पाजियला
तरी गुण न ये तैसा जैसा प्रेमळ स्त्रीशब्दाला ॥
प्रेम रेशमी रज्जु असीचा घाय घालितां न तुटे
परि मृदु म्हणुनी बांधि जया त्या स्पर्शीं सौख्याचि वाटे
प्रेमाच्या किल्लीनें नुघडें ऐसें कुलुप न भुवनीं
विश्वकर्मि-कौशल्य विधीनें असें आणिलें कुठुनी ॥
प्रेमाच्या शाईनें लिहिलें अक्षर कधिं नच वाळे
जरी उघडिले प्रखर रवीनें आपुले द्वादश डोळे ॥
मनिचीं अपुल्या स्त्रीपति मिळणें जगतांत फार कठिण अ
खेळांत आंधळया कोशिंबिरिच्या मारणें गड्यास जसें ॥
प्रेमासम दाता नच भोक्ता प्रेमासमान नच दुसरा
देईल जीव घेइल प्रेमी जन मानितात तोच खरा ॥
रंकाच्या प्रेमाला रावाची भीति ही न वश करिते
दंड नमावि सर्वा परि प्रेम तया मुळिंच दाद ना देते ॥

प्रेमाचें तोरण जगीं एकच त्यांतूनि सर्वही जाती
निर्धन नम्रचि नमवी उत्तुंग शिरासही प्रबळ नृपती ॥
गणितीं एकामाजी एक मिळवितांचि दोन होतात
प्रेमांक-मिती अद्भुत चौ हातांचाचि एक करि हात ॥
मदनाच्या संग्रामीं पुष्पांचे बाण मिळविती विजया
कीं सुभ्रु स्त्री सैनिक भ्रुकुटी चापावरूनि मारि तयां ॥
शब्द प्रथम प्रगटला सृष्टींत ब्रह्म नाम त्या साजे
प्रेमळ दयिता शब्दा ऐकियलें प्रथम मर्म तरि समजे ॥
संसाराच्या पुष्पीं प्रेम मधू गुप्तरूप परि असतो
प्रेमी स्त्री मधमाशी मध्यस्थीविण तिच्या न तो मिळतो ॥
पुरुष मनानें चंचळ प्रेमीं त्या करमणूक मात्र दिसे
परि तें जीवन, सार्थक जीवाचें, स्त्रीस सकल काहिं असे ॥
आश्रम-भंग करी नर लोकोत्तर जरि मनांतुनी हौशी
स्वामी कुमार कार्तिक वीर तरी वरित देवसेनेशीं ॥

## ११

# सिंह-दुर्ग-प्रशस्ति

माथां निर्मळ नीलांतराळ । समंतभागीं अतळ पाताळ
मध्यें पर्वतशिखर विशाळ । 'सिंह-दुर्ग' त्या नांव ॥

शैलोत्तमांगीं राहोनि उभा । पाहतां निसर्गनिर्मित शोभा
हृदयांगणीं प्रतिभारंभा । लीलानृत्य करूं पाहे ॥

कीं हा स्वर्गावतरण-सोपान । अथवा देवतानिवासंस्थान
सादर कातर मुदित मन । यातें पाहोनि होतसे ॥

येथें गगन ठेंगणें झालें । वाटे स्वर्गाचि हातां आलें
भूमंडळ क्षुद्रत्वें व्यापिलें । कष्टें दिसें पाहतां ॥

भूगत रूक्षत्व लोपलें । वरि स्निग्ध मार्दव विलेपिलें
कीं रंगशलाकेनें रेखिलें । चित्रकारें स्मृतिचित्र ॥

जिकडे तिकडे एकसरी । गिरी मागें पसरले गिरी
अर्धोन्मीलित दलकुसरी । जेवि कमळीं दिसतसे ॥

कीं हे करंडक गुप्तपुटी । सृष्टिदेवतेचिया गांठीं
शृंगारभूषा ठेवण्यासाठीं । विश्वकर्म्यें निर्मियले ? ॥

छायाप्रकाश सरमिसळ । रविकर पसरवी पातळ
दावी नीचोच्च रूप सकळ । लीलास्पर्शें करोनी ॥

गहन गिरिपार्श्वसंपुटीं । दुरुनी अवचित पडतां गांठी
प्रेमनिर्भर मारिती मिठी । सरिता सख्या आनंदें ॥

कीं असतांहि अति निकट । पर्वतपति हे निष्ठुर निपट
षण्मासांतहि नच भेट । होऊं देती स्ववधूंची ॥

पहा हा दिग्गज पर्वत बळी । तृण पसरोनि गंडस्थळीं
शुंडादंडें वृक्ष कवळी । मुखीं ग्रास घालावया ॥

पर्वतपृष्ठ नखशिखांत। ठायीं ठायीं निम्नोन्नत
त्यांतोनि जलनिर्झर वाहत। घर्ममाला जेवि श्रमें ॥
अतुलबलिनी निसर्गरमणी। पाककर्मनिपुण गृहिणी
घेवोनि अशनि कातरणी। गिरिशष्कुलीतें मुरड घाली ॥
गिरिपादपीठीं वृक्षवेली। पसरती शीतळ साउली
पक्षिगण चिमकुलीं घरकुलीं। त्यांत बांधोनि नांदती ॥
ठायीं ठायीं निर्मळ पाणी। त्यांत बिंबली शैलश्रेणी
जळमंदिराची उभारणी। तेवि शोभा दिसतसे ॥
भेटतां निश्चल निर्झरिणी। रूप पाहुनी भूषादर्पणीं
सुग्रिवधू वेणीफणी। वाटे करित उल्हासें ॥
येथ काळेकभिन्न पाषाण। तेथ मृण्मयपट विस्तीर्ण
तिकडे कोमल हरित तृण। आसनांपरी पसरियलें ॥
श्रमसायासें नांगरणी। करोनि समृद्ध धान्यखाणी
आशावंत कृषिवलगणीं। गर्भाकांक्षिणी भू केली ॥
अनंत पाउलवाटा उमटल्या। जिकडे तिकडे पसरल्या
जणुं रक्तवाहिन्या चितारिल्या। अखिल पर्वतशरीरीं ॥
वरुनी चालले पशु अनेक। स्वैरसंचर भक्ष्योन्मुख
आकंठ तृण-कवळा आणिक। जयांस सुख वा मोक्ष नसे ॥
ग्रामीं वनीं मनुष्यसंचार। असुनि न होत दृष्टिगोचर
दिसत तरी अल्पाकार। जैशा वारुळीं पिपीलिका ॥
पहा इकडे ही पुण्यनगरी। शिरुनि बैसली क्षितिकुहरीं
वृक्षपल्लवां अभ्यंतरीं। लपोनि गेली सर्वथा ॥
उंच प्रासाद सौधशिखरें। तैशीं हरिमंदिरें गोपुरें
विविध जलसंचय सारे। एका पंक्तीस बैसले ॥
चित्रवर्ण बिंदुकुश। दिसती नगरावयव लेश
थोरां सान साना अदृश्य। केवि केलें गिरिराजें ॥

दुर्ग सिंह पदें फिरवून। होत असेल नामाभिधान
तेंच यासि उचित जाण। सुगुणरूप अनुसारें॥

दुर्ग मृगांतील मृगेंद्र। दुर्ग नरांचा नरेंद्र
दुर्ग देवतांचा देवेंद्र। सर्वांहुनी श्रेष्ठ असे॥

मानधन स्वायत्त उन्नत। कोणी न करी याशीं लगट
दुरून देखतांच दंडवत। यास घालिती सर्वहि॥

पुण्य-दशकोशीचें रक्षण। अंगिकारी प्रबळ विचक्षण
शतघ्नी निःश्वसितें मरण। पूर्वीं शत्रूंस देतसे॥

अनंत पाद अनंत हस्त। पसरोनि देह अति प्रशस्त
रात्रंदिन हा घाली घस्त। आप्तरक्षणा कारणें॥

मस्तकीं वाहे नित्य भरारा। सागर-तुषार-वाही वारा
हा न देत क्षणभर थारा। दुष्ट घातक रोगबीजां॥

या न लतांची आवडी। या न मधुर फळांची गोडी
या समीप न मिळे वाढी। कुसुम-कलिका-लीलेला॥

यासि गर्द छाया नावडे। प्रखर रवितापें तेजाचि चढे
दुर्मनस्क होउनि कुढे। जरि घन पसरी आतपत्र॥

सहा ऋतु बाराहि मास। देती यासि दृढ विश्वास
अवगणुनी सुखदुःखास। तत्पर समान राहताती॥

निवडक वृक्ष पक्षिगण। जरि सेवक तरि मित्रासमान
स्नेहबद्ध करोनि जाण। संग्रहीं ठेवी महानुभाव॥

जयांसि चाळवी सुखलालसा। चंचळ मनें करिती हव्यासा
त्यांसि हा मर्मज्ञ सहसा। जवळीं थारा देत नसे॥

याची सहज वेषरचना। या नावडती पोषाख नाना
याचियां मना किंवा नयनां। सौंदर्य लोभवूं न शकेचि॥

परि ऋतु-मित्राची याचना। हा औद्धत्यें अवमानीना
उचित स्वपरमनरंजना। यथाप्रसंगें करीतसे॥

येतां वसंत सन्मुख । हा पावतसे अव्याज हरिख
सहपरिवारें सेवी सुख । मधुमाधवसंगतीं ॥

आरक्त कोमल पल्लव लोल । मधुनि मधुनीं शिंपोनि जल
त्यास आणिली शोभा अतुल । पहा समयज्ञें गिरिराजें ॥

वृक्षशाखांचीं तोरणें ।-लावुनि वनस्थलींचीं अंगणें
शोभविलीं स्वागताकारणें । श्री-प्रिय वसंत ऋतूच्या ॥

नीलांबराचें छत उभारी । श्वेताभ्रखंड लटकती वरी
मंगल मंडपाच्या झालरी । तेंवि शोभिवंत दीसती ॥

येथ न विलासी कोकिळा । आम्रासवमदें चढवोनि गळा
दाविण्या अंगीची गायनकळा । तरी न कांहीं उणेपण ॥

गगनभेदी प्रचंड घारी । मारितां योजनप्राय भरारी
करिती शब्द त्याची सरी । इतर गायना नच येई ॥

ऐसे अपूर्व देखावे । नयनां दिसती स्वभावें
शैलतटावरुनि हलावें । ऐसें मना मानेचना ॥

अविट रुचिर दर्शनसुख । नित्य दे जो दुर्गप्रमुख
तद्वर्णन समर्पक । कविमुखहि करिल केंवि ॥

## १२

# पाऊस

झिम् झिम् झिम् पर्जन्य पडे   गमत गगन जणुं मिटुनि नयन अश्रु
करुनि मलिन मुख करुण रडे ॥ झिम् झिम् झिम् ॥ ध्रु० ॥

घन जमले बहु दाट भरारा   वायु हालवी वृक्ष थरारा
हरिणगण पहा अशनि-रव-भयें   घन कुंजांतरिं शिरुनि दडे ॥ झिम्०॥१

दिशिं दिशिं सुचपल वीज चकाकत   निज तेजें करि दृष्टी विफलित
परि रंगित पसरोनि पिसारा   मयूर किति नाचत मुरडे ॥ झिम्०॥ २

दिव्य रथावरि इंद्र धनुर्धर   बसुनि सोडितां सर सर सर शर
ग्रीष्मवीररिपु होउनि जर्जर   शरण येउनी चरणिं पडे ॥ झिम्० ॥ ३

बसली गर्भाधानविधानीं   भूधर पतिसह भूमी रमणी
तत्शिरिं मंत्रोदकप्रोक्षणीं   जलद पुरोहित करीं पडे ॥ झिम्० ॥ ४

## १३

# गासी व्यर्थचि तूं कोकिळे

### [ अन्योक्ति ]

गासी व्यर्थचि तूं कोकिळे ॥ ध्रु०॥

आवर्षण पडुनि भू करपली   ग्रीष्म-उग्रता वसांतिं आली
ठिणगी पडतां पेटे होळी   जीव छायेंतही तळमळे ॥ गासी० १

वृक्षगण पहा सारा सुकला   झाला पालविचा पाचोळा
स्मशान भासे नव्हे हा मळा   मेला जगला जीवहि न कळे ॥ गा० २

आम्रमंजरी क्वचितचि उरली   उरली तीही काळी पडली
रुक्ष टरफलें तोंडीं बनलीं   आसव लव तुज केवि मिळे ॥ गासी० ३

स्वभावधर्में जरि तूं गासी   तरि कौतुक तव काय जगासी
आत्मनिष्ठ मधुरता तयासी   गर्व वाहसी फुकट खुळे ॥ गासी० ४

जा सोडुनि हा निष्फळ चाळा   धुंडुनि काढी अपुल्या बाळा
पाज लाव त्यां कांहिं जिव्हाळा ।   मातृपद तरी सहज फळे ॥ गा० ५

स्वाभिमान हा श्रेष्ठ गुण खरा ।   रुचि न त्याविना परोपकारा ॥
परपिंडानें पुष्ट नच बरा ।   देह हें न तुज अजुनि कळे ॥ गासी० ६

१४

# हें पहा आमचं नव राज्य !

[ चाल—पोवाड्याची ]

आम्हि राज्य बनवल नव । अश्शि तस जस मनाला व्हाव
आमचेवर कुरपा क्येलि येव ॥ ध्रु० ॥

तार पोस्ट दोनिबी खातीं दिलिं गोगलगाइच्या हातीं
काय बिशाद् यस्याल तक्रारी धा वर्सांत येक 'डिलिवरी' १
खेकड्या रेल गाडीचा सुप्परदंड करू जलमाचा
मागफुड हवी तशि गाडी बगलन बगलन काढी २
मांजरा क्येला रखवालदार दुधलोणी राखायचा कारभार
कदि व्हइना इक्ति बी चोरी प्रामाणिक त्ये लइ भारी ३
गाढवा गुपितपोलिस नेमून दिल आम्हि खास
त्यो उकीरडा फुंकून येइ चोरीचा तलास लावुन ४
डुक्कर सफाइ कामगार घाण राखु न ये तिळभर
गांव ठेवित धुतल्यावाणी घालून गंगच पाणी ५
कोल्होबा क्येला नैधीश वादि परतिवादि बी खुष
न्हाइ मुदमालाची बि तक्रार समदा बिळांत ग्येला पार ६
वाघसिंहाचि क्येली भरती रिह्लार राखण्या खातीं
त्येला मायाच समयाहून राखतो पोटिं घालून ७
वानरा करू इंजन्येर बांधकामाच त्येला ध्येन थोर
रातभर करील नकाशा दिस फुटता गुंडाळि गाशा ८
अजगरा वसूली काम रयतला अश्शि आराम
हातांत आणुन कर येती त्येना खिनांत मिळती पावती ९
दागदुजिचीं समदीं खातीं दिलिं उंदराघुशीच्या हातीं
शेताच्या बांध उरोळ्या राखितात धरमशाळा १०

बैलाला मास्तर क्येला   कादि मारि न इद्यार्थ्योला
घेऊन शिकशन खास   करून सोडी आपुल्या सरिस   ११

मुंगिला सेनापति करा   शत्रुला न तिळभर थारा
वारुळाचा खंदक क्येला   साप आयता त्येतच शिरला   १२

कुत्रा वकील परदरबारी   त्यो गुपित राखतो भारी
भुकु भुकून आक्षि ब्येजार   तह कराया लइ हुश्शार   १३

घुबड झाल दरबारि गवई   मधरात्रिच द्ये आरोळी
त्येच गाण ऐकता जरा   पोराथोरांचा जिव घाबरा   १४

हत्तिला क्येला वाकनिस   खंडीचा येकच घास
काटकसरी हाय त्यो फार   खायाचच तुडवुन पार   १५

अस्वलाला खुषमस्करी   राज धन्याचि करमणुक करी
हसवील गुदगुल्या करुन   गोष्टी सांगल कान भरभरून   १६

कोंबड्या पलंगीं पहारा   रातभर मुडदा तरी बरा
परि धन्याचि साखरझोंप   मोडमोडील अरवुन खूप   १७

येक वाणच पुरालि न अजुनी   नव्या राज्या हुडकितो धनी
आम्हि दमलों शोधशोधुनी   परि तयारच व्हइना कुणी   १८

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3440
REFBK-0003440
REFBK-0003440

## संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन

लेखक—न. चिं. केळकर.

पृष्ठसंख्या सुमारें ९०—किंमत ८ आणे.—ट. खर्च वेगळा.

पत्ता—५५४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

## दोन नवे ग्रंथ

### श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें चरित्र

प्रस्तावनालेखक—प्रो० ल. ग. लेले.

कि. ८ आणे

### काव्यहार

( कवि—'विवेक' )

प्रस्तावनालेखक—रा० सा० कृ. वि. वझे, एल्. सी. ई.

कि. १२ आणे

विश्वनाथ गणेश आणि मंडळी, पुणें.